25-03-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 03/24/2025 10:01 PM Page 1



निवडक



## काले येथे पहिली लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन

■ टीम दैनिक हेराल्ड

**काकोडा, दि. २४ :** देवणामळ काले सांगे येथील साई स्पोर्ट्स अणि कल्चरल क्लबतर्फे १७ ते २७ एप्रिल दरम्यान पहिल्या लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेची सविस्तर माहिती पत्रकार परिषदेत क्लबाध्यक्ष किशोर गावस देसाई यांनी दिली. सदर स्पर्धा दोन गटात खेळवण्यात येणार असून एक गटात पंचायत क्षेत्रापुरती मर्यादित तर दुसरी शहरी भागांसाठी असेल. प्रत्येक गटासाठी फक्त आठ संघांची निवड प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या तत्वावर केली जाईल. सदर स्पर्धा काले पंचायतीच्या मैदानावर काले येथील खेळविण्यात येईल. ५ एप्रिल २०२५ पर्यंत प्रवेशिका सादर करण्यात यावी. स्पर्धेतील विजेत्या संघाला रु. ५५०५५ तर उप विजेत्या संघास रु. ३५०३५ ची रोख बक्षिसे तर इतर अनेक वैयक्तिक बक्षिसे देण्यात येतील. स्पर्धेचे उद्घाटन १७ एप्रिल रोजी तर बक्षीस वितरण दि. २७ रोजी होणार आहे, अशी माहिती क्लबचे अध्यक्ष किशोर देसाई यांनी दिली. प्रवेश शुल्क ७००० रुपये असेल व क्लबच्या सर्व खेळाडूंना टी-शर्ट देण्यात येईल. विशेष माहिती साठी आयोजन समितीचे सदस्य शिरीष खुटकर ९७६४६०१२९९ व विश्वेंद्र नाईक ९७६५१८५८४३ यांच्या कडे संपर्क साधून माहिती घ्यावी.

---

## लोककलाकार जानकी गावस यांना ग्रामभूषण पुरस्कार



■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. २४ :** गादोवाडा,केरी सत्तरी येथील ९० वर्षीय लोककलाकार जानकी रामा गावस यांना पहिला ग्रामभूषण पुरस्कार प्राप्त झाला असून २९ मार्च रोजी रावण सत्तरी येथे होणाऱ्या ४ थ्या ग्रामीण साहित्य संमेलनाच्या उद्घाटन सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. लेखक आणि लोकवेद अभ्यासक गोपिनाथ गावस यांनी आपल्या मातोश्री स्व.सौ.लक्ष्मी विष्णू गांवस यांच्या स्मरणार्थ हा पुरस्कार पुरस्कृत केला आहे. रोख रु. ५ हजार, स्मृतिचिन्ह आणि मानपत्र, असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. साहित्य मंथन सत्तरीतर्फे दर दोन वर्षांनी सत्तरीतील विविध भागात ग्रामीण साहित्य संमेलनाचे आयोजन केले जाते. यानिमित्त यावर्षीसून हा पुरस्कार देण्यात येणार आहे. लोककला, संगीत, साहित्य, नाटक, क्रीडा, शिक्षण अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या व आपल्या गावाचे नाव उज्वल केलेली व्यक्ती या पुरस्कारासाठी पात्र असेल. जानकी गावस या लोककलाकार असून मागची अनेक वर्षे धालो, फुगडी, सोकारती, जात्यावरच्या ओव्या, लग्नगितांचे गायन करतात. केरी गांवातल्या हळीद वाड्यावरील श्री बेळेवंश कुळ येथील धालो मांडांवर आजही तेवढ्याच उत्साहात धालो गीते गाताना आणि धालो प्रकार खेळताना दिसतात.

ग्रामभूषण पुरस्कार निवड समितीत केंद्रीय साहित्य अकादमी पुरस्कार विजेते लेखक डॉ.प्रकाश पर्येकर, साहित्य मंथन-सत्तरीचे अध्यक्ष काशिनाथ नाईक,लोकवेद अभ्यासक गोपिनाथ गावस,लेखिका व सामाजिक कार्यकर्त्या नमन सावंत धावस्कर आणि चौथ्या ग्रामीण साहित्य संमेलनाचे कार्याध्यक्ष गणेश शेटकर यांचा सहभाग होता.

---

## हरमल पंचायत क्षेत्रातील आज सोपो पावणी

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. २४ :** येथील पंचायत क्षेत्रातील जत्रा व इतर सोपो कर पावणी मंगळवार दि. २५ मार्च रोजी सकाळी १०.३० वाजता पंचायत कार्यालयात होणार असल्याचे हरमलच्या उपसरपंच तथा प्रभारी सरपंच सोनाली माज्री यांनी कळविले आहे. तरी या पावणीसाठी भाग घेऊ इच्छिणाऱ्या व्यक्तींनी वेळेत उपस्थित राहावे तसेच पावणीच्या अटी व नियमपत्रक कार्यालयीन वेळेत पाहण्यासाठी उपलब्ध असल्याचे प्रभारी सरपंच सोनाली माज्री यांनी कळविले आहे.

# लोककला टिकवण्यासाठी शिमगोत्सवाचे आयोजन

### आमदार प्रवीण आर्लेकर | शिमगोत्सवाचा प्रारंभप्रसंगी देवी भगवती, देव रवळनाथ यांना श्रीफळ अर्पण

■ टीम दैनिक हेराल्ड




**पेडणे : शिमगोत्सवाचा प्रारंभ करताना आमदार प्रवीण आर्लेकर. सोबत नगराध्यक्ष मनोज हरमलकर, उपनगराध्यक्ष उषा नागवेकर व इतर.**

**पेडणे, दि. २४ :** भारतीय संस्कृतीला प्रोत्साहन देत असताना लोककला टिकवण्यासाठी गावागावातील शिमगोत्सव आज मोठ्या प्रमाणात सरकारी पातळीवर साजरा केला जातो. त्यातूनच नवोदित कलाकारांना स्थानिकांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे काम सरकार करत असते. पर्यटन खात्याअंतर्गत दोन दिवस चालणाऱ्या पेडणेतील शिमगोत्सवातून कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याबरोबरच कला संस्कृती टिकवण्याचे ही काम केले जाते, असे उद्गार पेडणेचे आमदार तथा पेडणे शिमगोत्सव समितीचे अध्यक्ष प्रवीण आर्लेकर यांनी दोन दिवस चालणाऱ्या शासकीय पातळीवरील शिमगोत्सवाचा प्रारंभ श्री देवी भगवती आणि श्री देव रवळनाथ यांना श्रीफळ अर्पण केल्यानंतर बोलताना केले.

यावेळी पेडणे नगराध्यक्ष मनोज हरमलकर, माजी नगराध्यक्ष तथा विद्यमान उपनगराध्यक्ष उषा नागवेकर, नगरसेवक शिवराम तुकोजी, भाजप मंडळ अध्यक्ष सिद्धेश पेडणेकर, नगरसेविका तृप्ती सावळ देसाई, नगरसेविका राखी खुशालकर नगरसेवक, नगरसेविका अश्विनी पालये कर, नगरसेविका विशाखा गडेकर, तोरसे सरपंच छाया शेट्ये, माजी सरपंच सूर्यकांत तोरस्कर, माजी जिल्हा पंचायत सदस्य रमेश सावळ ,भास्कर नारुलकर, धारगड माजी सरपंच भूषण उर्फ प्रदीप नाईक, वारखंड उपसरपंच वसंत नाईक, मोपा सरपंच सुबोध महाले, वारखंड माजी सरपंच गौरी जोसालकर , सरपंच रामचंद्र परब, माजी सरपंच प्रार्थना मोटे ,कोरगाव माजी सरपंच स्वाती गवंडी, प्रतीक्षा आरोलकर, सुनील नाईक, आनंद सावळ देसाई, हसापूर उपसरपंच रुचीरा मळीक, पंच प्रजय मळीक, माजी सरपंच नवनाथ नाईक, पंच बाळा शेटकर आदी उपस्थित होते.

आमदार प्रवीण आर्लेकर यांनी पुढे सांगितले की पेडणे मतदारसंघाच्या विकासाबरोबरच लोक संस्कृती लोककला याचे जतन करत असताना ती टिकवून ठेवण्यासाठी नवोदित कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी सरकार ज्या पद्धतीने प्रयत्न करत आहेत. तशाच पद्धतीचे आपलेही प्रयत्न असून शिगम्रोसवातून लोक संस्कृती बरोबरच लोक कला टिकवण्याचं काम केले जाते. अशा कार्यक्रमाला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावून वेगवेगळ्या कलाकारांचे कलेचे दर्शन घेऊन आपणही त्या कलेमध्ये समरस व्हावे, असे आवाहन आमदार आर्लेकर यांनी केले.




# वेदांत, गोपाळ, सागरला जेतेपद

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २४ :** मडगाव क्रिकेट क्लबने राजेश घोडगे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ आयोजित केलेल्या अल्टिमेट ट्रायो ट्रॉफी' या क्रिकेटच्या आगळ्यावेगळ्या प्रकारात वेदांत नाईक, गोपाळ गावस व सागर शेट या त्रिकुटाने विजेतेपद पटकावले. त्यांनी अंतिम सामन्यात कपिल बोरकर, अनुप कुडचडकर व विनय सांबारी यांचा पराभव केला. उपांत्य फेरीत वेदांत नाईकच्या संघाने सिद्धेश अळवेकरच्या संघाचा तर कपिल बोरकरच्या संघाने साहीश महांबरे याच्या संघाचा पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश केला होता. मडगावच्या एमसीसी मैदानावर झालेल्या या स्पर्धेत प्रत्येकी ३ खेळाडूंचा एक संघ या प्रमाणे एकूण १६ संघांचा समावेश होता.

कपिल बोरकर याला ७१ धावांसाठी स्पर्धेतील सर्वोत्तम फलंदाजाचा पुरस्कार लाभला. स्पर्धेतील ६ बळी घेतलेला गोपाळ गावस सर्वोत्तम गोलंदाज ठरला. शिवम सिंग, साई नाईक व द्विज पालयेकर या त्रिकुटाला सर्वोत्तम क्षेत्ररक्षक म्हणून गौरविण्यात आले. बक्षीस वितरण समारंभाला काणकोण येथील श्री मल्लुकार्जुन व श्री चेतन मंजू देसाई कॉलेजचे चेअरमन व सामाजिक कार्यकर्ते चेतन देसाई हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

वेस्टर्न बेव्हरेजेस प्रायव्हेट लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक रोहित कामत आणि प्रायोरिटी कन्स्ट्रक्शन्सचे संचालक स्वप्नील नास्नोळकर हे सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित होते.

# हरमल लीग क्रिकेटमध्ये धनंजय फायटर विजेता

### सागर वॉरियर्स उपविजेता | ६ संघांचा सभाग

■ टीम दैनिक हेराल्ड



**हरमल : मळो बॉयज आयोजित लीग विजेत्या धनंजय संघास संघास चषक देताना बाप्पा पेडणेकर. सोबत सुशांत रामजी व खेळाडू**

**हरमल, दि. २४ :** हरमल येथील मळो बॉईज आयोजित खालचावाडा क्रिकेट लीग आठ षटकांच्या स्पर्धेत धनंजय फायर फायटर संघाने सागर वॉरियर्स संघाचा पराभव करून विजेतेपद पटकावले. या स्पर्धेत ६ संघांनी सभाग घेतला होता.

स्पर्धेतील विजेत्या व उपविजेत्यांना रोख बक्षीस व सुशांत रामजी पुरस्कृत चषक देण्यात आले.स्पर्धेत सामनावीर भावेश वायंगणकर व मालिकावीर धनंजय वस्त याना स्मृतिचिन्ह देण्यात आले.बक्षीस वितरण सोहळ्यात जेष्ठ ग्रामस्थ बाप्पा पेडणेकर उपस्थित होते.ह्यावेळी विजेत्या संघातील धनंजय, दीपू, काका, वेदू, स्वामी, शाहू, राजन, भाबो, बंटी, शौनक व मिथुन याना खास बक्षिसे देण्यात आली. मित्रत्वाच्या भावनेने क्रिकेट खेळल्यास खिलाडूवृत्ती टिकून राहते. प्रत्येक क्रीडापटूने नैसर्गिक खेळाबरोबर खिलाडूवृत्ती जोपासली पाहिजे. दोन्ही संघाचे अभिनंदन असल्याचे पेडणेकर यांनी व्यक्त केले. मान्यवरहस्ते विजेत्यांना बक्षिसे देण्यात आली. शेवटी सुशांत रामजी यांनी आभार मानले.

# ऐतिहासिक वेशभूषा स्पर्धेत आरोही, सुरेंद्र प्रथम

■ टीम दैनिक हेराल्ड



**वळवई : आरोही वेरेकर हिला प्रथम बक्षीस देताना निता तारी. बाजूस श्रमेश भोसले, विनायक वेंगुर्लेकर, ज्ञानेश्वर तारी व इतर.**

**सावईवेरे, दि. २४ :** वळवई येथील शिव प्रतिष्ठानतर्फे अखिल गोवा पातळीवर आयोजित केलेली ऐतिहासिक वेशभूषा स्पर्धा उत्साहात संपन्न झाली. ही स्पर्धा १५ वर्षांखालील व १५ वर्षांवरील अशा दोन गटात घेण्यात आली.

१५ वर्षांखालील गटात प्रथम – आरोही वेरेकर, द्वितीय – अनैशा परब, तृतीय – ऋत्वी नाईक, चौथे – आर्या वेरेकर, पाचवे – दीप सावंत

१५ वर्षांवरील गटात प्रथम – सुरेंद्र वळवईकर, द्वितीय – साईराज वळवईकर, तृतीय – सुयश वळवईकर यांना बक्षिसे मिळाली. स्पर्धेचे परीक्षण रेश्मा नाईक व अंकिता नाईक यांनी केले.

बक्षीस वितरण सोहळा जिल्हा पंचायत सदस्य श्रमेश भोसले, सरपंच विनायक वेंगुर्लेकर, उपसरपंच मिताली शेट, पंच सदस्य अंजली वेंगुर्लेकर, काशिनाथ नाईक, सर्वेश नाईक,देवस्थानचे अध्यक्ष ज्ञानेश्वर तारी, प्रतिष्ठानचे अध्यक्ष रत्नाकर तारी, नुनू तारी , सुरेंद्र वळवईकर,निता तारी यांच्या उपस्थितीत झाला.

# चित्ररथ स्पर्धेत दुर्भाटच्या त्रिवेणी कला संघ प्रथम

### रोमटामेळमध्ये खांडेपार शिगमोत्सव समिती पहिली

■ टीम दैनिक हेराल्ड



**मडगाव: केपे सार्वजनिक शिमगोत्सवात सहभागी झालेले एक पथक**

**मडगाव, दि. २३ :** केपे शिगमोत्सव समितीने आयोजित केलेल्या शिगमोत्सवात चित्ररथ गटात दुर्भाटच्या त्रिवेणी कला संघाला तर रोमटामेळ गटात खांडेपार शिगमोत्सव समितीला पहिले बक्षिस मिळाले. लोकनृत्य गटात फोंडाच्या राम कला संघाने पहिले स्थान पटकावले. शिगमोत्सवातील विविध गटांतील स्पर्धांत सहभागी झालेल्या स्पर्धक व पथकांना घवघवीत बक्षिसे देण्यात आली. या शिगमोत्सवात प्रमुख पाहुणे म्हणून माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू, तर सन्माननीय पाहुणे म्हणून विधानसभेचे सभापती रमेश तवडकर, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष दामू नाईक, माजी उपमुख्यमंत्री चंद्रकांत (बाबू) कवळेकर, दक्षिण गोवा जिल्हा पंचायतीच्या अध्यक्ष संजना वेळीप, केपेच्या नगराध्यक्ष दिपाली नाईक, जिल्हा पंचायत सदस्य शाणू वेळीप, सिद्धार्थ गावस देसाई, सिद्धेश नाईक, नगरसेवक दयेश नाईक, प्रसाद फळदेसाई, चेतन हळदणकर, गणपत मोडक, सरपंच शीतल नाईक, मोहन गावकर, प्रियांका वेळीप, पर्यटन खात्याचे उपसंचालक राजेश काळे, भाजपाचे प्रदेश सचिव सर्वानंद भगत, भाजपाचे दक्षिण गोवा अध्यक्ष प्रभाकर गावकर, उद्योजक संतोष देसाई व सुदेश भिसे, केपे भाजपा मंडळ अध्यक्ष कृपेश वेळीप उपस्थित होते. जिल्हा पंचायत सदस्य व केपे शिगमोत्सव समितीचे अध्यक्ष खुशाली वेळीप हेही उपस्थित होते. चित्ररथ गटात दुर्भाटच्या त्रिवेणी कला संघाला ४५ हजार रुपयांचे पहिले, नेरुलच्या श्रीदेव धाडेश्वर स्पोर्टस् अँड कल्चरल क्लबला ३० हजार रुपयांचे दुसरे, बांदोड्याच्या महालक्ष्मी नागरिक समितीला २५ हजार रुपयांचे तिसरे, माशेलच्या धाडसकल स्टार स्टार्स स्पोर्टस अँड कल्चरल क्लबला २० हजार रुपयांचे चौथे, कुंभारजुवा नागरिक समितीला १५ हजार रुपयांचे पाचवे व आडपई युवक संघाला १० हजार रुपयांचे सहावे बक्षिस मिळाले. रोमटामेळ गटात खांडेपार शिगमोत्सव समितीला ३५ हजार रुपयांचे पहिले, केपेच्या चंद्रेश्वर भुतनाथ शिगमोत्सव मंडळाला २० हजार रुपयांचे दुसरे, कुडचडे काकोडा शिगमोत्सव मंडळाला १५ हजार रुपयांचे तिसरे, बोरीच्या अवेडेकर समाजाला १० हजार रुपयांचे चौथे, सांगेच्या पाईकदेव शिगमोत्सव समितीला ७ हजार रुपयांचे पाचवे व शिरोडाच्या सहावे श्री मंडलेश्वर मानगुरू शिगमोत्सव मंडळाला सहावे बक्षिस मिळाले. लोकनृत्य गटात पहिले २० हजार रुपयांचे बक्षिस फोंडाच्या राम कला संघाला मिळाले, १५ हजार रुपयांचे दुसरे बक्षिस फोंडाच्याच सरस्वती मंडळ केळबाई-कुर्टी पथकाला, १० हजार रुपयांचे तिसरे बक्षिस सावईवेऱ्यांचो सख्याहरीला, ८ हजाराचे चौथे बक्षिस पैंगीणच्या टिटोस स्पोर्टस अँड कल्चरल क्लबला, ५ हजाराचे पाचवे बक्षिस कुर्टीच्या शांतादुर्गा शिवरंजनी कला संघाला मिळाले. वेशभूषा ज्युनियर गटात कियान माधव नाईक, शिवम वेळीप, दशमी देविदास, शनया जाधव, भाव्या शिरोडकर व प्रान्शी महाले यांना अनुक्रमे पहिले ते सहावे बक्षिस मिळाले. वेशभूषा सिनीयर गटात इश्वर नाईक, धनंजय नाईक, वैभव देसाई, सिद्धी फळदेसाई, मदन तारी व प्रमोद तारी यांना अनुक्रमे पहिले ते सहावे बक्षिस मिळाले.




**थिवी : गोमंतक धनगर समाजोन्नती मंडळात मधू वरक यांच्या अध्यक्ष पदाखाली निवडण्यात आलेली नूतन समिती.**

# गोमंतक धनगर समाजोन्नती मंडळाच्या अध्यक्षपदी मधू वरक

■ टीम दैनिक हेराल्ड

**साळ, दि. २४ :** गोमंतक धनगर समाजोन्नती मंडळ बार्देश तालुका शाखेची कार्यकारणी समितीची वार्षिक आमसभा नुकतीच व्होळावणे - थिवी येथील बाबू कोकरे यांच्या निवासस्थानी सरचिटणीस विठोबा खरात यांच्या अध्यक्षतेखाली झाली.

यावेळी उपाध्यक्ष बया वरक, खजिनदार सुनील जांगळी व इतर समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. या आमसभेत मागील सभेतील अहवाल वाचून कायम करण्यात आला तसेच जमा खर्चाला मंजुरी देण्यात आली व सरचिटणीस विठोबा खरात यांच्या अध्यक्षतेखाली बारदेश तालुक्याची २०२५ ते २०२८ या कालावधीसाठी नूतन समिती निवडण्यात आली .

नूतन समिती पुढील प्रमाणे - अध्यक्ष मधू वरक, सचिव - सुदेश पाटील, खजिनदार - लक्ष्मण खरवत, उपाध्यक्ष - संदीप शेळके व कृष्णा खरवत, उपसचिव - सर्वेश वरक, उपखजिनदार - विठू शिंदे तसेच कार्यकारी सदस्य - लक्ष्मण शेळके, संतोष गवळी, श्याम पाटील, विठ्ठल वरक, मार्गदर्शक सदस्य - विनायक खरात, धाकू वरक, सोनू फाळे, पांडुरंग धोंडू पाटील , बांबू दिला कोकरे यांची निवड करण्यात आली आपल्या समाजाला उन्नतीच्या दिशेने घेऊन जाण्यासाठी सर्वांच्या सहकार्याची अपेक्षा बाळगून नूतन अध्यक्ष मधु वरक यांनी उपस्थितांचे आभार मानले

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २०२ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 202 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .